महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा पुणे विभाग पुणे
लेखा कोष भवन, जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे -411 001

Email - jd.pune@mahalfa.in
दूरध्वनी क्रमांक : 020-26120216

वाचा
1. वित्त विभाग, शासन अधिसूचना क्र सेवाप 1107/प्र.क्र.196/2/कोषा (प्रशा-3) दि. 02/12/2008
2. संचालनालय, लेखा व कोषागारे मुंबई यांची दि. 09.01.2019 रोजीची जाहिरात
3. संचालनालय, लेखा व कोषागारे मुंबई यांचे पत्र क्र.सलेको/प्रशा-कोषा/कार्या 5/ प्र.क्र. 2303/ 2019/613, दि.06.07.2019
4. संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई यांचे पत्र क्र सलेको/प्रशा-कोषा/कार्या-5/ प्र.क्र. 2303/ 2019/ 665, दि. 22.07.2019
5. या कार्यालयाचे पत्र क्र. स्था/18/ब/क.ले प/नियुक्ती शिफारस/529 दि. 03.08.2019

क्र.स्था/18/ब/पुणे/आस्था-2/क.ले.प./नियुक्ती आदेश/2018-19/2019/ 563 दिनांक 7 AUG 2019

## आदेश

संदर्भ क्र 1 च्या शासन अधिसूचनेद्वारे स्थानिक निधी लेखा, गट- क सेवा (सेवाप्रवेश) नियम 2008 हे नवीन सेवाप्रवेश नियम लागू झाले आहेत. संचालनालय लेखा व कोषागारे महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या कार्यालयाच्या स्तरावरुन **कनिष्ठ लेखापरीक्षक** या विभागीय संवर्गातील रिक्त पदे भरण्यासाठी संदर्भ क्र 2 अन्वये उमेदवारांची Online लेखी परीक्षा जाहिरात प्रसिध्द करण्यात आलेली होती त्या जाहिरातीच्या अनुषंगाने दि.28.2.2019 ते 07.03.2019 या कालावधीत आयोजित करण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने प्राप्त झालेल्या निकालपत्राच्या आधारे तयार करण्यात आलेल्या तात्पुरत्या विचाराधीन उमेदवारांच्या यादीमधून खालील उमेदवाराची कनिष्ठ लेखापरीक्षक या पदासाठी कागदपत्रे पडताळणी अंती गुणानुक्रमे निवड झाली आहे. त्यानुसार खालील उमेदवारांना कनिष्ठ लेखापरीक्षक पदावर सुधारित वेतन संरचनेतील वेतन बँड रुपये 5200-20200 **ग्रेड वेतन रुपये 2800 व सातव्या वेतन आयोगातील मॅट्रीक्स स्तर** S-10 व **वेतन सरचना 29200-92300** या वेतनश्रेणीत जाहिरातीत नमूद केलेल्या व खाली दर्शविलेल्या अटी व शर्तीच्या अधिन राहून **तात्पुरत्या स्वरुपात** नियुक्ती देण्यात येत आहे.

| अ. क्र. | उमेदवाराचे नाव व पत्ता | नियुक्तीचे पदनाम | मूळ जात प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | पदस्थापना दिलेल्या कार्यालयाचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|---|
| 1 | श्री.करण अशोकराव मोतकुलवाड मु.पो.सिरंजनी ता. हिमायतनगर जि.नांदेड | कनिष्ठ लेखापरीक्षक | अनुसूचित जमाती | खुला | सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा कार्यालय,जिल्हा परिषद आवार सोलापूर |

सदरची नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाचे दि.04.07.2018 च्या पत्रान्वये दिलेल्या सूचनांनुसार, जनहित याचिका क्रमांक 175/ 2018 व इतर प्रकरणामधील मा. मुंबई उच्च न्यायालयाचे दि.27.06.2019 च्या निकालाच्या अधीन राहून करण्यात येत आहे. सदर नियुक्तीबाबत काही तांत्रिक मुद्दा उपस्थित झाल्यास/ आक्षेप आल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता संबंधित उमेदवाराची नियुक्ती रद्द करण्यात येईल.